| CNR NO:MHAM170015822025 | नियमित फौजदारी खटला क्रमांक १३९/२०२५ | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | दाखल तारीख | :– | ०४.१०.२०२५ | | |
| | नोंदणी तारीख | :– | ०४.१०.२०२५ | | |
| | निकाल तारीख | :– | २०.०६.२०२६ | | |
| | कालावधी | :– | वर्ष | महिना | दिवस |
| | | | ०० | ८ | १७ |
| | निशानी क्रमांक | :– | १७ | | |

**फॉर्म क्रमांक ३२**
**भाग अ**
**न्यायनिर्णय**
**[फौजदारी मार्गदर्शिका, प्रकरण ६, परिच्छेद ४४ (i)]**

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, तिवसा, ता. तिवसा,**
**जिल्हा – अमरावती यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी रोहिणी वि. मनोरे)**

## न्यायनिर्णय

**(घोषीत दिनांक २०.०६.२०२६)**

**नियमीत फौजदारी खटला क्र.१३९/२०२५**

**सरकार विरूध्द राहुल हरीदास मनोहर**

**अपराध क्रमांक – ४४७/२०२५ पोलीस स्टेशन, तिवसा**

| | |
|---|---|
| फिर्यादी | महाराष्ट्र शासन मार्फत पोलीस स्टेशन अधिकारी, पोलीस स्टेशन, तिवसा, ता. तिवसा, जिल्हा – अमरावती. |
| अभियोग पक्षातर्फे वकील | **कु. एल. टी. गेडाम,** विद्वान सरकारी अभियोक्ता |
| आरोपी | **राहुल हरीदास मनोहर**<br>वय – २७ वर्ष, व्यवसाय – मजुरी,<br>रा. तिवसा, ता. तिवसा, जि. अमरावती |
| आरोपीतर्फे अधिवक्ता | **विद्वान विधीज्ञ श्री. पी. पी. गाडे.** |

**भाग ब**

**[फौजदारी मार्गदर्शिका, प्रकरण ६, परिच्छेद ४४ (ii)]**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | १४.०७.२०२५ |
| प्रथम खबरी अहवालाचा दिनांक | १८.०७.२०२५ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | ०४.१०.२०२५ |
| दोषारोपपत्र ठेवल्याचा दिनांक | २९.१२.२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | २२.०१.२०२६ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याची तारीख | लागु नाही. |
| न्यायनिर्णय घोषीत तारीख | २०.०६.२०२६ |
| शिक्षा दिली असल्यास ती तारीख | लागु नाही. |

**आरोपीचा तपशील**

| आ. क्र. | आरोपीचे नांव | अटक केल्याचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | आरोप केलेला गुन्हा | निर्दोष मुक्तता किंवा दोषी | सुनावण्यात आलेली शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ नुसार संपरीक्षे दरम्यान आरोपी न्यायबंदी असलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **राहुल हरीदास मनोहर** | २८.०८.२०२५ | ३०.०८.२०२५ | भा.न्यां.सं. २०२३ चे कलम ३०३(२) | निर्दोष मुक्तता | लागु नाही | लागु नाही |

## न्यायनिर्णय

## (पारीत दिनांक २०.०६.२०२६ )

आरोपीविरुध्द भारतीय न्याय सहिंता, २०२३ चे कलम ३०३(२) (थोडक्यात 'भा.न्या.सं.,२०२३') अंतर्गत शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्याकरीता संपरिक्षा चालविण्यात आली.

**अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.**

२. दिनांक १४.०७.२०२५ रोजीच्या दुपारी ०४.३५ वाजताच्या दरम्यान वाजताच्या दरम्यान फिर्यादी अमरावती येथे नवीन मोटार सायकल विकत घेणेकरीता पाहण्यासाठी जाताना त्याने त्यांची होंडा शाईन कंपनीची काळया कलरची मोटार सायकल क्रं एम.एच.२७ बी.ए. ७३१४ ही बस स्टड मोझरी येथील पोलिस चौकीच्या मधील गल्ली मध्ये उभी केली होती. तेव्हा त्याचा गाडीला हॅन्डल लॉक नव्हते. अमरावतीचे काम करून तो बसने परत मोझरी येथे ऱात्री १० वाजताच्या दरम्याण पोहचला असता तेव्हा बस स्टॅड मोझरी येथे पोलीस चौकीच्या गल्ली मध्ये फिर्यादीला त्याची मोटार सायकल दिसून आली नाही म्हणुन त्याने अज्ञात व्यक्ती विरूध्द त्याची मोटार सायकल चोरून नेल्याबाबत सदरची फिर्याद दाखल केली.

३. फिर्यादीच्या तक्रारीवरुन पोलीस स्टेशन, तिवसा येथे आरोपीविरुध्द गुन्हा क्रमांक ४४७/२०२५ नुसार भारतीय न्याय सहिंता, २०२३ चे कलम ३०३(२) नुसार

अनोळखी एक इसमा विरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला. त्याचा तपास हेड कॉन्सटेबल श्री. रविन्द्र लांजेवार, ब.नं. १७२१ यांनी केला. त्यांनी घटनास्थळावर जाऊन साक्षीदारांसमक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला. साक्षीदारांचे बयाण नोंदविले. आरोपीला अटक केली. तपास पुर्ण करुन तपासी अधिकारी यांनी न्यायालयात आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

**४.** संपरीक्षेदरम्यान आरोपी विरुध्द निशाणी क्रमांक १० नुसार दोषारोप निश्चीत केला. सदरचा दोषारोप हा आरोपीला मराठी भाषेमध्ये वाचुन व समजावुन सांगीतला. आरोपीने तो नाकबुल असल्याचे सांगीतले व खटला पुढे चालविण्याची मागणी केली.

**५.** आरोपींविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने २ साक्षीदार तपासले आहेत. निशाणी क्रमांक १ वरील आदेशान्वये अभियोग पक्षाचा पुरावा त्यांच्या विनंतीवरुन बंद करण्यात आला. आरोपींविरुध्द पुरावा अभिलेखावर आल्या नसल्यामुळे आरोपीचे भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ३५१ (१) (ब) अन्वये निवेदन नोंदविण्यात आले नाही.

**६.** अभियोग पक्षातर्फे विद्वान सरकारी अभियोक्ता कु. एल. टी. गेडाम व आरोपीतर्फे विद्वान वकील श्री. पी. पी. गाडे यांचा युक्तीवाद ऐकला.

**७.** सहाय्यक सरकारी अभियोक्ता तसेच आरोपीचे विद्वान विधीज्ञ यांनी

केलेल्या युक्तीवादावरुन खालील मुद्दे न्यायनिवाडा करण्याकरीता माझ्या पुढे उद्भवले. त्यांचे सकारण निष्कर्ष व कारणमिमांसा मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | आरोपीने फिर्यादीची याची होंडा शाईन कंपनीची काळया कलरची मोटार सायकल क्रं एम.एच.२७ बी.ए. ७३१४ अंदाजे किमंत रू २०,०००/– ही बस स्टॅंड मोझरी येथील पोलिस चौकीच्या मधील गल्ली मधुन फिर्यादीच्या ताब्यातुन त्याच्या परवानगी शिवाय चोरल्याचे आरोपीविरुध्द भारतीय न्याय सहिंता, २०२३ चे कलम ३०३(२)प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | **नाही.** |
| २. | आदेश काय ? | **अंतीम आदेशाप्रमाणे आरोपीची निर्दोष सुटका करण्यात येते.** |

**<u>कारणमिमांसा</u>**

**<u>मुद्दा क्रमांक १ करीता</u> –**

८. आरोपीविरुद्ध भारतीय न्याय सहिंता, २०२३ चे कलम ३०३(२)प्रमाणे गुन्हा सिद्ध करण्यासाठी अभियोग पक्षाने हे सिद्ध करणे आवश्यक आहे की, आरोपीने फिर्यादीची होंडा शाईन कंपनीची काळया कलरची मोटार सायकल क्रं एम.एच.२७ बी.ए. ७३१४ अंदाजे किमंत रू २०,०००/– ही बस स्टॅंड मोझरी येथील पोलीस चौकीच्या मधील गल्ली मधुन फिर्यादीच्या ताब्यातुन त्याच्या परवानगी शिवाय चोरी केली.

९. आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने फिर्यादी साक्षीदार क्रमांक १ – मिथुन (नि.क्र. १२) याला तपासले. त्याने त्याच्या पुराव्यादरम्यान तो आरोपीला ओळखत नसल्याचे सांगितले. घटना ही दिनांक १४.०७.२०२५ रोजी घडल्याचे सांगीतले. पुढे त्याने असे कथन केले की, घटनेच्या दिवशी तो अमरावती येथे त्याच्या पत्नी करीता नवीन मोटार सायकल पाहण्यासाठी गेला होता तेव्हा त्याची मोटार सायकल क्रं एम.एच.२७ बी.ए. ७३१४ हि मोझरी बस स्टॅड येथे ठेवून गेला होता. तो परत मोझरी येथे आल्या नंतर त्याने ठेवलेल्या ठिकाणी त्याला त्याची मोटार सायकल दिसून आली नाही. तेव्हा फिर्यादीने त्याच्या घरमालक विजय खराटे यांना सदर घटनेबाबत सांगितले. नंतर त्याने पोलीस स्टेशन, तिवसा येथे जाऊन फिर्याद (नि.क्र.१३) व छापील प्रथम खबरी अहवाल (नि.क्र.१४) दिला. उलटतपासादरम्यान फिर्यादीने अज्ञात व्यक्ती विरूध्द रिपोर्ट दिला होता हे मान्य केले. सदर साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, फिर्यादीने त्याच्या रिपार्ट मध्ये (नि.क्र.१३) व छापील प्रथम खबरी अहवालात (नि.क्र.१४) मध्ये त्याची होंडा शाईन कंपनीची काळया कलरची मोटार सायकल क्रं एम.एच.२७ बी.ए. ७३१४ चोरी झाल्याबाबत नमुद केले आहे. परंतु सदर मोटार सायकल आरोपीने चोरी केल्याबाबत त्याने कोणत्याही पुरावा दिला नाही. तसेच त्याने त्याच्या उलटतपासादरम्यान मान्य केले की, त्याने रिपोर्ट हा अज्ञात व्यक्ती विरूध्द दिला होता. अभियोग पक्ष हा सदर साक्षीदाराला तपासुन फिर्यादीची मोटार सायकल क्रं

एम.एच.२७ बी.ए. ७३१४ ही आरोपीने चोरली ही बाब सिध्द करण्यास अपयशी ठरला.

**१०.** अभियोग पक्षातर्फे घटनास्थळ पंच साक्षीदार क्र. २ विजय (निशाणी क्र. १६) याला तपासण्यात आले. त्यांनी त्यांच्या सरतपासात असे सांगीतले की, तो आरोपीला ओळखत नसल्याचे पण तो फिर्यादीला ओळखत असल्याचे सांगितले. दिनांक १८.०७.२०२५ रोजी पोलीसांनी त्याला घटनास्थळ पंचनामा करण्याकरीता मोझरी बस स्थानकाजवळ बोलविले असल्याचे सांगितले. तसेच त्यावेळी दुसरे पंच वैभव करडीकर हे हजर होते हे सांगितले. फिर्यादीची होंडा शाईन गाडी चोरीला गेली होती याबाबत त्याला बोलविले होते असे त्याने सांगितले. सदर घटनास्थळ पंचनाम्यावर त्याची सही असल्याचे त्याने सांगीतले. परंतु त्यातील मजकुर त्याला माहित नसल्याचे त्याने सांगितले. सदर साक्षीदारने त्याचा उलटतपासा दरम्यान हे मान्य केले की, पोलिसांनी त्याला पंचनाम्याकरीता हजर राहण्याकरीता नोटीस दिली नव्हती तसेच त्याची सही किती तारखेला घेतली होती हे त्याला माहिती नसल्याचे सांगितले. त्याने मान्य केले की, कोणाची कोणती गाडी चोरीला गेली होती हे त्याला माहिती नाही. सदरहु साक्षीदाराने त्याचा सरतपासात सांगितले की, त्याला पंचनाम्यातील मजकुर माहित नाही. म्हणुन अभियोगपक्ष हा पंचनामा सिध्द करण्यास अपयशी ठरला.

**११.** आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने फिर्यादी म्हणुन साक्षीदार क्रं १ मिथुन (नि क्रं १२) व पंच म्हणुन साक्षीदार क्र. २ – विजय (नि.क्र. १६)

यांना तपासले. त्यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान ते आरोपीला ओळखत नसल्याचे सांगीतले. फिर्यादी साक्षीदार क्रं १ मिथुन (नि क्रं १२) याने त्याचा सरतपासात दरम्यान त्यांची मोटार सायकल क्रं एम.एच.३४ बि.ए.७३१४ ही आरोपीने चोरल्याबाबत कोणत्याही पुरावा दिला नाही तसेच तो आरोपीला ओळखत नसल्याचे सांगितले. तसेच त्याचा उलटतपासादरम्यान त्याने मान्य केले की त्याने फिर्याद ही अज्ञान व्यक्ती विरूध्द दिली होती. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रं २ विजय (नि.क्र. १६) याला पंच म्हणुन तपासले परंतु त्याचा पुराव्यातुन अभियोग पक्ष वर नमुद केल्याप्रमाणे घटनास्थळ पंचनामा सिध्द करण्याकरीता अपयशी ठरले. फिर्यादी साक्षीदार क्रं १ मिथुन (नि क्रं १२) व पंच साक्षीदार क्र. २ – विजय (नि.क्र. १६) यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदर साक्षीदारांनी अभियोग पक्षास आरोपीविरुद्ध गुन्हा सिद्ध करण्यासाठी सहकार्य केले नाही. तसेच अभियोगपक्ष हा घटनास्थळ पंचनामा सिद्ध करु शकला नाही.

**१२.** अभियोग पक्षाने आरोपविरुध्द गुन्हा सिद्ध करण्यासाठी आरोपीने फिर्यादीच्या ताब्यातुन त्याची मोटार सायकल क्रं एम.एच.३४ बि.ए.७३१४ त्याचा परवानगी शिवाय अप्रमाणीकपणे चोरी केली हे सिध्द करण्यास अपयशी ठरला. तसेच वारंवार संधी देऊन देखील अभियोग पक्ष हा जप्ती पंचनामा सिद्ध करण्यास अपयशी ठरला. आरोपीविरुद्ध गुन्हा संशयापलिकडे सिद्ध करण्याची जबाबदारी हे संपुर्णतः अभियोग पक्षावर असते. सदर प्रकरणामध्ये अभियोग पक्षाला वारंवार संधी देऊन सुध्दा अभियोग पक्ष हा आरोपीविरुध्दचा

गुन्हा संशयापलीकडे सिध्द करण्याकरीता तपासी अधिकारी व इतर साक्षीदारांना तपासण्यात अपयशी ठरला. अभियोग पक्षाने तपासलेल्या पंच साक्षीदारांनी अभियोग पक्षाला पुरक अशी साक्ष न दिल्यामुळे अभियोग पक्ष हा आरोपीविरूध्द घटनास्थळ पंचनामा सिध्द करण्यास अपयशी ठरला आहे. फिर्यादी साक्षीदार क्रमांक १ मिथुन (नि क्रं १२) याने उलटतपासादरम्यान मान्य केले की, त्याने रिपोर्ट हा अज्ञात व्यक्ती विरूध्द दिला होता. सदर साक्षीदाराने घटना हि प्रत्यक्ष बघितली नाही. तसेच तो आरोपीला देखील ओळखत नाही.

**१३.** अभियोग पक्षाने घेतलेल्या पुराव्याचे एकंदरीत अवलोकन केले असता असे निषन्न होते की, आरोपीने फिर्यादीच्या ताब्यातुन त्याची मोटार सायकल क्रं एम.एच.३४ बि.ए.७३१४ त्याचा परवानगी शिवाय अप्रमाणीकपणे चोरी केल्याबाबतचा कोणताही सबळ, पुरेसा व विश्वसनीय पुरावा अभियोग पक्षाने अभिलेखावर आलेला नाही. अभिलेखावर दाखल असलेल्या पुराव्याच्या आधारे हे न्यायालय या निष्कर्षावर पोहोचत आहे की, अभियोग पक्ष हा आरोपीविरुध्द सबळ पुराव्याअभावी भारतीय न्याय सहिंता, २०२३ चे कलम ३०३(२) नुसारचा दोषारोप सिध्द करण्यास पुर्णपणे अपयशी ठरलेला आहे. **त्यामुळे सदर न्यायालय मुद्दा क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी देत आहे.**

**<u>मुद्दा क्रमांक २ करीता</u>–**

**१४.** अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द कोणत्याही प्रकारचा सबळ, विश्वसनीय,

पुरेसा व संशयाच्या पलीकडचा पुरावा सादर केला नाही. त्यामुळे सदर खटल्यातुन आरोपीला निर्दोष मुक्त करणे योग्य होईल, असे दिसुन येते. इ.कि.फौ.अर्ज क्रमांक ६६/२०२५ नुसार जप्त मोटार सायकल क्रं एम.एच.३४ बि.ए.७३१४ हे फिर्यादीला सुपूर्तनाम्यावर देण्यात आली आहे. सदरहु सुपूर्तनामा कायम करण्यात येतो. **सदर न्यायालय मुद्दा क्रमांक २ च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.**

## आदेश

**१.** आरोपी **राहुल हरीदास मनोहर,** याची भारतीय न्याय सहिंता, २०२३ चे कलम ३०३(२) अन्वयेच्या गुन्ह्यातुन भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७१ (१) नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येते.

**२.** आरोपीचा वैयक्तीक जात मुचलका व जामीन कदबा रद्द करण्यात येतो.

**३.** इ.कि.फौ.अर्ज क्रमांक ६६/२०२५ नुसार जप्त मोटार सायकल क्रं एम.एच.३४ बि.ए.७३१४ ही फिर्यादीला सुपूर्तनाम्यावर देण्यात आले आहे. सदरहु सुपूर्तनामा कायम करण्यात येतो.

**४.** आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१ नुसार प्रत्येकी रुपये १५,०००/– चा वैयक्तीक जात मुचलका व जामीन कदबा दयावा.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषीत करण्यात आला).**

स्वा/-
**(रोहिणी वि. मनोरे)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
**तिवसा.**

**दिनांकः २०.०६.२०२६.**
**तिवसा.**

नि.फौ.ख.क्र. १३९/२०२५
शासन वि. राहुल हरीदास मनोहर
न्यायनिर्णय (नि. क्र. १७)

## भाग क

## [फौजदारी मार्गदर्शिका, प्रकरण ६, परिच्छेद ४४ (iii)]

## अभियोग पक्षाच्या साक्षीदारांची यादी/बचाव/न्यायालयाचे साक्षीदार

**अ. अभियोग :–**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| साक्षीदार क्रमांक १ | मिथुन नंदलाल हटवार (नि.क्र.१२) | फिर्यादी. |
| साक्षीदार क्रमांक २ | विजय परसराम खराटे (नि.क्र.१६) | घटनास्थळ पंच. |

**ब. बचाव साक्षीदार :–**

| श्रेणी | नांव | पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. कोर्ट साक्षीदार :–**

| श्रेणी | नांव | पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

नि.फौ.ख.क्र. १३९/२०२५
शासन वि. राहुल हरीदास मनोहर
न्यायनिर्णय (नि. क्र. १७)

## अभियोग पक्षाचे/बचाव/कोर्ट निशाणी

**अ. अभियोग :–**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | स्वरुप |
|---|---|---|
| १. | नि.क्र.१३/सा.क्र.१ | फिर्याद. |
| २. | नि.क्र.१४/सा.क्र.१ | प्रथम खबरी अहवाल. |

**ब. बचाव :–**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. कोर्ट निशाणी :–**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ड. मुद्देमाल :–**

| अनुक्रमांक | मुद्देमाल क्रमांक | स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

स्वा/-
(रोहिणी वि. मनोरे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
तिवसा.

दिनांकः २०.०६.२०२६
तिवसा

## CERTIFICATE

"I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same word to word, as per original Judgment."

| | | |
|---|---|---|
| Name of Jr. Clerk | : | **D. P. Deshmukh,** |
| Name of Court | : | Civil and Criminal Court, Teosa |
| Judgment dictated on | : | 20.06.2026 |
| Transcript ready on | : | 20.06.2026 |
| Judgment Signed by | | |
| Presiding Officer on | : | 20.06.2026 |
| Judgment uploaded on | : | 16.07.2026 |

Note :- Due to CIS technical (Connectivity) problem judgment could not be upload on same day.